# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.१०६५४/२१/अ.क्र.११/२५/०१**

तक्रारकर्ता **Mr. Reggie Peter Dias**
H.No. 31, Kalina, 1st Floor,
Kalina Village, Santacruz (East)
Mumbai – 400029.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एच/पूर्व विभाग**
एच/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
एच/पूर्व विभाग यांचे कार्यालय, प्लॉट क्र. १३७, टीपीएस ५,
दुसरा रोड, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पू.), मुंबई ४०० ०५५.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एच/पूर्व विभाग**
एच/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
एच/पूर्व विभाग यांचे कार्यालय, प्लॉट क्र. १३७, टीपीएस ५,
दुसरा रोड, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पू.), मुंबई ४०० ०५५.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०४.०३.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित, ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि.२५.०२.२०२५ रोजी प्राप्त झाली |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर तक्रारीवर आज दिनांक ०४.०३.२०२५ रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे.

अपीलार्थी यांनी दि. १५.०१.२०२१ रोजी केलेल्या माहिती अर्जावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. ०९.०८.२०२१ रोजी अपीलार्थीस कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती शुल्क आकारुन १५ दिवसांत द्यावी, असे आदेशित केले होते. परंतु उक्त आदेशाप्रमाणे माहिती मिळाली नाही, म्हणून अपिलार्थी यांनी दिनांक २०.०९.२०२१ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये आयोगाकडे तक्रार दाखल केली.

आजच्या सुनावणीस तक्रारदार, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एच/पूर्व विभाग व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एच/पूर्व विभाग यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतेही पूर्व सूचना न देता अनुपस्थित आहेत.

प्रथम अपील आदेशनंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे तक्रारदार यांनी तक्रार अर्ज सादर केला आहे.

Scanned with CamScanner

या प्रकरणी कोणतेही आदेश पारीत करण्यापूर्वी तक्रारदार, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. या प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांना सुनावणीची नोटीस प्राप्त असूनही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अनुपस्थितीबद्दलच्या लेखी खुलासासह व त्यांचेवर प्रत्येकी रु. १०,०००/- दंड का लावण्यात येऊ नये, याच्या खुलासासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०८.०४.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

प्रदीप व्यास 4-3-2025

**( डॉ. प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०४.०३.२०२५**

State Information Commission ★ Maharashtra ★

Scanned with CamScanner